नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १६/०५/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत ०१ कि.मी अंतरावरील मौजा कळमेश्वर येथे दिनांक १५/०५/२०२२ चे ०९.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. वंदना रामूजी खडाळ, वय ४४ वर्ष, रा. वार्ड क्र. ११ दत्तमंदीर जवळ, कळमेश्वर नागपूर व आरोपी क्र. १. सागर भोजराज जिचकार, वय २२ वर्ष व २. भोजराज मधुकर जिचकार, वय ५० वर्ष, दोन्ही रा. कळमेश्वर हे एकमेकांचे शेजारी आहेत. दि. १५/०५/२०२२ रोजी सकाळी ०९.४५ वा फिर्यादीचे पतीने त्याची हिरो पॅशन मोटारसायकल ही घरासमोर उभी केली असतांना आरोपी यांनी दोन्ही पक्षात असलेल्या किरकोळ वादाचे कारणावरून फिर्यादीचे पतीला 'साल्या तु इथे मोटरसायकल कशी उभी करतो' असे बोलुन फिर्यादीचे पतीला शिवीगाळ केली. यानंतर आरोपीने लोखंडी रॉड घरातुन आणुन फिर्यादीचे पतीला 'तुला ठार मारण्यासाठीच तर लोखंडी रॉड आणला आहे' असे बोलुन फिर्यादीचे डोक्यावर रॉड मारून जिवंत मारण्याचा प्रयत्न केला. फिर्यादीने तो वार चुकवित असतांना फिर्यादीस दुखापत झाली आहे. तसेच आरोपीतांनी फिर्यादीची वरील मोटारसायकल जाळुन नुकसान केले आहे.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ४५३, ३२३, ५०४, ५०६, ४२७, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. गायकवाड मो.क्र. ९९२३९८८२९२ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत सप्तश्रृंगी मंदिर, चनकापूर येथे दिनांक ११.०५.२०२२ चे १५.०० ते १५.०५.२०२२ चे १४.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— मितलेश रविदयाल रामटेके वय ३२ वर्ष, रा. चनकापूर हे आपले मामाच्या घरी छिंदवाडा मध्यप्रदेश येथे गेले होते. तसेच त्यांची फॅमिली हि पुर्विच गेली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घरामध्ये प्रवेश करून बेडरूम मध्ये असलेली अलमारी मध्ये ठेवलेला एक सोनी कंपनीचा लॅपटॉप कि. १०,०००/—रू., दोन चांदीच्या पायपट्या, दोन हाताचे कडे ०२ नग कि १०,०००/—रू., ३) दोन मातीचे गुल्लक ज्यामध्ये नगदी १९,०००/—रू. व दोन हॅण्डबॅग ज्यामध्ये अंदाजे नगदी ११,०००/—रू. असा एकुण कि. ५६,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री राजेश पिसे मो.नं. ९८८१७७७३४८८ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. बोरी** :— अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील दुधा येथे दिनांक १४.०५.२०२२ चे २०.०० ते १५.०५.२०२२ चे ०७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— चेतन सुधाकर गांवडे, वय ३० वर्ष, रा. भारकस, ता हिंगणा, जि नागपुर यांचे महावितरण कंपनीचे लघुदाब वाहनीचे लावण्यात आलेले अल्युमीनीअम तार हि लोखंडी पाच लोखंडी पोल वाकवुन ५,०००/—रू. चे नुकसान करून त्यावरील ॲल्युमीनीअम तार कि. २०,०००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

. सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ४२७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि रेजीवाड मो.नं. ९७६५८३७०६९ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**